# वडगांव नगरपंचायत

वडगांव ता.मावळ जि.पुणे - ४१२१०६
स्थापना - ०३ / ०२ / २०१८

दुरध्वनी क्र : १८००८३३६३६३ इ - मेल : vadgaon9@gmail.com

## ❃ जाहिर आवाहन ❃

वडगाव नगरपंचायत हद्दीतील सर्व सृजाण नागरिकांना सुचित करणेत येते कि, वडगाव नगरपंचायतीची चतुर्थ वार्षिक कर आकारणी सन २०२३ - २४ ते २०२७ - २८ या वर्षाकरिता कर आकारणीचे काम प्रगतीपथावर सुरू आहे.

### ✿ नविन करप्रणालीची वैशिष्ट्ये ✿

- सर्व मिळकत धारकांना स्वतःच्या मिळकतीचा डिजीटल नकाशा व फोटो नगरपंचायत कार्यालयात कधीही पाहता येईल अशी सुविधा करण्यात आलेली आहे.
- महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम अंतर्गत चतुर्थ करनिर्धारण प्रारूप याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या व नगरपंचायत कार्यालयामध्ये नागरिकांना पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आल्या.
- महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ११९ नुसार ज्यांचे हरकती/तक्रार अर्ज नगरपंचायत कार्यालयामध्ये प्राप्त झाले अशा मिळकत धारकांना महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १२० नुसार नोटीस प्राप्त झाली अशा अर्जदारांचे मा.सहाय्यक संचालक नगररचनाकार विभाग पुणे यांनी दिनांक ५/१२/२०२३ रोजी सुनावणीसाठी नगरपंचायत कार्यालय वडगाव येथे हजर रहावे.

- सर्व कर मिळकत धारकांना मोबाईलद्वारे मॅसेज पाठविण्यात येईल.

याद्वारे सर्व नागरिकांना सूचित करणेत येते कि, शहरातील विकास कामांना गती मिळावी यासाठी सर्वांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरणा करून वडगाव शहराच्या विकासात सहभागी व्हावे. व ज्यांचे मालमत्ता कर थकित असेल त्यांनी लवकरात लवकर कर भरून त्यावरिल विलंब शुल्क टाळावा. असे आवाहन मुख्याधिकारी डॉ.प्रविण निकम यांनी केले आहे.

तसेच ज्या मालमत्ता धारकांना मालमत्ता हस्तांतरण अथवा नविन नोंदी करावयाचे असेल त्यांनी विहीत नमुन्यातील कागदपत्रे जमा करून आपल्या नावे नोंद करून घ्यावी.चतुर्थ वार्षिक कर आकारणीचे काम पुर्ण झाल्यावर **आपण घर बसल्या आपला मिळकत कर भरू शकता.** त्यामुळे आपला मौल्यवान वेळेची बचत होईल.

□□□□□□□□□□□□□□□□□□□


तुमचा मिळकत कर
ऑनलाईन भरा.वेळ वाचवा.


PROPERTY
TAX